# मुंबई विद्यापीठ

<u>स्मरणपत्र-१</u>

दुरध्वनी क्र. ०२२-६८३२ ००५२

Email : supt.statunit@gmail.com

शैक्षणिक नियुक्त्या व गुणवत्ता हमी
(सांख्यिकी कक्ष)
खोली क्र. २०२, दुसरा मजला,
मुंबई विद्यापीठ, फोर्ट,
महात्मा गांधी मार्ग,
मुंबई- ४०० ०३२.

**No. AAQA/ICD/2023-24/ 1096 of 2023**

<u>परिपत्रक</u> :-

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२३-२४ या वर्षाकरीता ऑनलाईन विद्यार्था संख्या बाबतची (Student on Roll - https://eoffice.mu.ac.in/STATISTICAL) माहिती नोंदविणेबाबत.**

**संदर्भ : या विभागाचे No. UDSTAT/ICD/2023-24/ 905 of 2023, दिनांक १० ऑक्टोबर, २०२३ रोजीचे परीपत्रक.**

---

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाबाबतचे संदर्भीय परिपत्रकाच्या अनुषंगाने आपल्या असे निदर्शनास आणून देवू इच्छितो की, सदर विभागामार्फत **शैक्षणिक वर्ष २०२३-२४** या वर्षाची **Student on Roll** बाबतची माहिती **https://eoffice.mu.ac.in/STATISTICAL** या वेबपोर्टवर ऑनलाईन स्वरूपी नोंदविण्याबाबत कळविण्यात आलेले होते.

सदरची ऑनलाईन माहिती ही विद्यापीठास माहितीपुर्ण धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी आणि शिक्षण क्षेत्राच्या विकासाकरीता संशोधन करण्यासाठी उपयुक्त असते. तसेच केंद्र शासन व महाराष्ट्र शासन यांच्या विविध प्राधिकरणांना/विभागांना व माहितीचा अधिकार, २००५ व इतर यांना पाठविणे महत्वाचे असल्याकारणाने ती माहिती आपल्यामार्फत ऑनलाईन स्वरूपी सादर करणे अत्यंत आवश्यक बाब आहे.

प्रती शैक्षणिक वर्षानुसार **Student on Roll** बाबतची माहिती ऑनलाईन स्वरूपी मागविली जाते. परंतु काही वेळेस आपल्या विद्यापीठ विभाग, महाविद्यालय/संस्थेकडून अनेक माध्यमांद्वारे (परिपत्रक, दुरध्वनी व ईमेलद्वारे) अवगत करूनसुध्दा माहिती दिलेल्या वेळेत सादर केली जात नाही, याची आप्रण विभाग प्रमुख, प्राचार्य/संचालक या नात्याने योग्य ती दखल घेवून उल्लेखित केलेली माहिती विनाविलंब सादर करण्याविषयी संबंधित कर्मचारी वर्गास सूचित करण्यात यावे. त्याचप्रमाणे आपले विद्यापीठ विभाग, महाविद्यालय/संस्था यांची उर्वरीत शैक्षणिक प्रवेश प्रक्रीया शिल्लक असल्यास, अशी बाब वगळता इतर पुर्ण असलेली माहिती वेबपोर्टलवर उपलब्ध असलेल्या विवरण पत्रानुसार **मंगळवार, दिनांक २८ नोव्हेबर, २०२३** पुर्वी ऑनलाईन स्वरूपी भरण्यात यावी.

तसेच ऑनलाईन स्वरूपातील माहिती भरण्यास काही समस्या/अडथळा उद्‌भवल्यास परिपत्रकामध्ये नमुद केलेल्या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधून शंकेचे निरसन करून घ्यावे व त्याचप्रमाणे आवश्यक ऑनलाईन (AISHE, MIS व Students on Roll बाबतची) माहिती पुर्ण भरून झाल्यानंतरचे हमीपत्र/प्रमाणपत्र मुंबई विद्यापीठ, शैक्षणिक नियुक्त्या व गुणवत्ता हमी (सांख्यिकी कक्ष), खोली क्र. २०२, दुसरा मजला, फोर्ट, यांचेकडून घेण्यात यावे.

(प्रा. सुनिल भिरूड)
प्रभारी कुलसचिव

मुंबई : ४०० ०३२
दिनांक : १ नोव्हेंबर, २०२३